**ठळक बातम्या**

- मराठा आणि ओबीसी उपसमित्यांमुळे सामाजिक सलोखा अबाधित राहील, कुणावरही अन्याय होणार नाही, असा चंद्रशेखर बावनकुळे यांना विश्वास

- गणेशविसर्जन मिरवणुकीतल्या दुर्घटनांमधे राज्यात १५ जणांचा मृत्यू

- जागतिक तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघाला कंपाऊंड प्रकारात सुवर्ण पदक

**आणि**

- आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या विजेतेपदासाठी थोड्याच वेळात भारत आणि कोरियाची लढत

**<><><><>**

मराठा आणि ओबीसी आरक्षणासाठी उपसमिती कार्यरत असून तिच्या शिफारशींमुळे सामाजिक सलोखा अबाधित राहील, उपसमितीकडून कुणावरही अन्याय होणार नाही, असं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. ते आज नागपुरात बातमीदारांशी बोलत होते.

ओबीसी पदाधिकारी न्यायालयात जात असतील तर तो त्यांचा अधिकार आहे. मात्र, सरकारही न्यायालयात ठामपणे आपली बाजू मांडेल, असं त्यांनी सांगितलं. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही राजकीय बाऊ न करता उपसमितीकडे आपली बाजू मांडावी, असं आवाहन त्यांनी केलं.

कृत्रिम वाळू धोरणाबाबत बावनकुळे म्हणाले की, राज्य सरकारनं ठोस धोरण आखलं असून प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी किमान ५० ते १०० क्रशर प्रोत्साहित करावेत. नवीन आणि जुन्या क्रशरना औद्योगिक धोरणाचा लाभ मिळणार आहे. नैसर्गिक वाळू ६०० रुपये प्रतिक्विंटल आहे, तर कृत्रिम वाळू केवळ २०० रुपयांत उपलब्ध होईल.

मध्यमवर्गीय कुटुंबांना आवश्यक वस्तूंवरचा जीएसटी कमी करण्याचं मोठं पाऊल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी उचललं असून त्याचा थेट लाभ सामान्यांना मिळणार आहे, असं ते म्हणाले.

**<><><><>**

देशभरात काल अनंतचतुर्दशीच्या दिवशी गणपती विसर्जनाने गणेशोत्सवाच्या मंगलपर्वाची सांगता झाली. पुढच्या वर्षी लौकर येण्याचं आवाहन करत लाडक्या गणरायाला निरोप देण्यात आला. मुंबईत अनंतचतुर्दशीच्या दिवशी गणरायाला निरोप देण्यासाठी सुरू झालेली विसर्जन मिरवणूक अद्याप सुरू आहे. विसर्जन सोहळ्याचं आकर्षण असलेल्या लालबागच्या राजाचं विसर्जन बराच वेळ खोळंबलं, अखेर काही वेळापूर्वी गिरगाव चौपाटीवर असंख्य भक्तांच्या उपस्थितीत राजाला निरोप देण्यात आला. तसंच उमरखाडीचा राजा, चिंचपोकळीचा चिंतामणी यासह सुमारे २० सार्वजनिक गणेशमंडळांच्या मानाच्या बाप्पाचं विसर्जनही शांततेत पार पडलं.

पुण्यात मानाच्या पाचही गणपतींचं विसर्जन काल वेळेत होऊनही इतर मंडळांनी वेळ न पाळल्यानं रेंगाळलेली मिरवणूक आज संध्याकाळी संपली.

हैदराबादमध्ये २ लाखापेक्षा जास्त गणेशमूर्तींचं विसर्जन शांततेत पार पडलं. खैरताबादच्या ६९ फूट उंचीच्या महागणेश मूर्तीचं विसर्जन हुसैनसागर तलावात करण्यात आलं.

**<><><><>**

राज्यात सर्वत्र गणेश विसर्जनाचा उत्साह शिगेला पोहोचला असताना काही ठिकाणी दुर्घटनांमुळे उत्सवाला गालबोट लागलं. विसर्जनादरम्यान, राज्यात विविध ठिकाणी मिळून १५ जणांचा मृत्यू झाला. मुंबईत साकीनाका परिसरात एका विसर्जन मिरवणुकीत हाय टेन्शन वायरमधून शॉक लागल्यानं एकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली आहे, तर या दुर्घटनेत ५ जण जखमी झाले असून त्यांना नजिकच्या रुग्णालयात दाखल केलं आहे. टाटा पॉवर कंपनीची ११ हजार व्होल्टेजची वायर मिरवणुकीच्या ट्रॉलीला लागून ही दुर्घटना घडली.

**पालघर जिल्ह्यात** विरारच्या मारंबळपाडा इथं गणेश विसर्जनादरम्यान खाडीत बुडणाऱ्या तीन भाविकांना स्थानिक मच्छीमार आणि रो-रो सेवेच्या कर्मचाऱ्यांनी वाचवलं.

**ठाणे जिल्ह्यात**ल्या शहापूरमध्ये विसर्जनादरम्यान तीन तरुण पाण्यात वाहून गेले.

**पुणे जिल्ह्यात** चाकण परिसरात वेगवेगळ्या घटनांमध्ये गणेश विसर्जनासाठी गेलेले चार जण पाण्यात बुडून मृत्युमुखी पडले. वाकी खुर्द इथल्या भीमा नदीत दोन जण, बिरदवडी इथल्या विहिरीत एक जण, तर शेलपिंपळगाव इथंही भीमा नदीत एक जण अशा वेगवेगळ्या घटनांमध्ये चार जण बुडाल्याचं दुदैवी वृत्त आहे.

**नाशिक जिल्ह्यात** गणेश विसर्जनादरम्यान गंगापूर रोडवरच्या आनंदवली परिसरात एक २४ वर्षीय तरुण नदीच्या पाण्यात बुडून वाहून गेला. नाशिक तालुक्यात गोवर्धन गावाजवळ एक, कळवणमधल्या दसराने आणि सिन्नर तालुक्यातही एक असे एकूण ४ जण वाहून गेले

**नांदेड**मध्येही गणेश विसर्जनासाठी गेलेले २ युवक नदीत बुडाले.

**अमरावती जिल्ह्यात** धामणगाव रेल्वे तालुक्यात वाघोली गावात विसर्जनाच्यावेळी एका २२ वर्षीय युवकाचा पाय घसरून तो नदीत वाहून गेला.

**वाशिम जिल्ह्यात** सेवादास नगर इथं विसर्जन करण्यासाठी अरूणावती नदीतीरावर गेलेला युवक नदीच्या प्रवाहात वाहून गेला.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेने या कराच्या रचनेत नुकतेच क्रांतिकारी बदल केले. घरगुती वापराच्या अनेक वस्तूंवरचा कर कमी झाल्यानं त्या स्वस्त होणार आहेत. ऐकूया त्याविषयीची सविस्तर माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड- व्हॉईस कास्ट- रश्मी**

*(तांब्याची, लोखंड आणि स्टेनलेस स्टीलची भांडी, केरोसीनचे बर्नर्स, स्टोव्ज, लोखंडी चुली या उपकरणांवरचा १२ टक्के कर आता ५ टक्के होणार आहे. पर्यावरणानुकूल सौर कुकरवरचा करही ५ टक्क्यांवर आला आहे. उच्च उत्पन्न गटातल्या घरांमधे वापरली जाणारी लोखंडी, स्टीलची आणि ॲल्युमिनियमची शोभिवंत भांडी आता १२ टक्क्यांऐवजी ५ टक्केच कर लागल्याने स्वस्त होऊ शकतात. याखेरीज डिशवॉशिंग मशीन, टीव्ही सेट्स, व्हिडियो रेकॉर्डींगची उपकरणं, सेट टॉप बॉक्स यांच्यावरचा जीएसटी कर २८ टक्क्यांवरुन १८ टक्क्यांवर आला आहे. ऐकूया याविषयी सर्वसामान्य गृहिणीची प्रतिक्रीया....*

**होल्ड- बाईट- रोहिणी**

*आता दसरा दिवाळी जवळ आली आहे.भांडी-कुंडी, टीव्ही, डिनरसेट वगैरे स्वस्त झाले तर नक्कीच खरेदीचा विचार करता येईल. )*

नवीन कररचना येत्या २२ सप्टेंबरपासून लागू होणार आहे.

**<><><><>**

जागतिक तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघाने कंपाऊंड प्रकारात सुवर्ण पदक पटकावलं आहे. ऋषभ, प्रथमेश आणि अमन या तीन भारतीय तीरंदाजांनी सर्वाधिक २५३ गुण मिळवले. फ्रान्सच्या संघाला २३३ गुण मिळवल्यामुळे रौप्य पदक मिळालं.

**<><><><>**

आशिया चषक पुरुष हॉकी अजिंक्यपद स्पर्धेचा अंतिम सामना भारत आणि कोरिया यांच्यात थोड्याच वेळात साडेसात वाजता सुरू होत आहे. सुपर फोर फेरीत मिळवलेल्या विजयामुळे सात गुणांसह भारत गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. या स्पर्धेतल्या विजेत्या संघाला पुढच्या वर्षी होणाऱ्या हॉकी विश्वचषकासाठी पात्रता मिळवण्याची संधी मिळेल. तत्पूर्वी, आज मलेशियानं चीनचा ४-१ असा पराभव करून तिसरं स्थान पटकावलं. तर जपानने बांगलादेशवर ६-१ अशी मात करून पाचवं स्थान मिळवलं.

**<><><><>**

यूएस ओपन टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीत आज अग्रमानांकित यानिक सिनर आणि दुसऱ्या क्रमांकावर असलेला कार्लोस अल्काराज अजिंक्यपदासाठी एकमेकांविरोधात मैदानात उतरणार आहेत. जगातलं सर्वात मोठं टेनिस कोर्ट आर्थर ॲश स्टेडियमवर भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेअकरा वाजता हा सामना सुरू होईल. जागतिक क्रमवारीतलं अग्रस्थान या सामन्यात ठरणार आहे. टेनिसच्या या हंगामात ग्रँडस्लॅम अजिंक्यपदासाठी एकमेकांविरुद्ध खेळण्याची सिनर आणि अल्काराजची ही सलग तिसरी वेळ आहे. यंदा सिनर यानं ऑस्ट्रेलियन ओपन आणि विम्बल्डनचं जेतेपद पटकावलं आहे, तर अल्काराजनं रॉलंड गॅरोसच्या जेतेपदावर नाव कोरलं आहे. आजच्या सामन्यात गतविजेता कार्लोस अल्काराज अग्रस्थानी पुन्हा पोहोचण्याचा आणि कारकीर्दीतलं सहावं ग्रँडस्लॅम अजिंक्यपद मिळवण्याचा प्रयत्न करेल, तर सिनरसमोर अग्रस्थान टिकवून ठेवायचं आणि पाचवं ग्रँडस्लॅम आपल्या नावावर करायचं आव्हान असेल.

<><><><>

आद्य क्रांतीवीर उमाजी नाईक यांच्या २३४ व्या जयंती निमित्त महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्याचं पहिलं संयुक्त राज्य अधिवेशन सांगलीतल्या विष्णूदास भावे नाट्यगृहात झालं. भारतीय कर्मचारी संघ आणि भारतीय स्वाभिमानी संघाने याचं आयोजन केलं होतं. अधिवेशनाचं उद्घाटन सर्वोच्च न्यायालयातले वकील मेहमूद प्राचा यांनी केलं.

<><><><>

जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात महाविकास आघाडी परभणी इथं १० सप्टेंबरला आंदोलन करणार आहे. आंदोलनाची तयारी करण्यासाठी आज महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांची बैठक झाली. या बैठकीला खासदार संजय जाधव, माजी आमदार विजय गव्हाणे, भाकप नेत्या माधुरी क्षीरसागर उपस्थित होत्या.

<><><><>

आरक्षणासंदर्भातल्या शासन निर्णयावर आक्षेप घेत सोलापूर जिल्ह्यातल्या विविध ओबीसी संघटनांचे प्रतिनिधी लवकरच मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेणार आहेत. आज जिल्ह्यातल्या विविध ओबीसी संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक झाली, त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

<><><><>

विरारमधल्या एका इमारतीतल्या सदनिकेचं छत कोसळल्यामुळे तीन जण जखमी झाले आहेत. तिघांवरही रुग्णालयात उपचार सुरू आहेत. महानगरपालिकेनं इमारत रिकामी केली असून पुन्हा एकदा स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

<><><><>

इटलीमधे व्हेनीस इथं आयोजित ८२व्या व्हेनीस आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात भारतीय चित्रपट निर्माती अनुपर्णा रॉय यांना ‘साँग्ज ऑफ फरगॉटन ट्रीज’या पहिल्याच चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून पुरस्कार मिळाला आहे. महोत्सवाच्या ओरीजॉन या विभागात नवोन्मेषासाठी त्यांना हा पुरस्कार प्राप्त झाला असून तो मिळवणाऱ्या रॉय या पहिल्या भारतीय ठरल्या आहेत.

<><><><>

नक्षलवाद्यांचा म्होरक्या अमित हांसदा ऊर्फ अपटन हा पोलिसांच्या गोळीबारात ठार झाला आहे. नक्षलवादी संघटनेचा विभागीय कमांडर असलेल्या अमितवर दहा लाख रुपयांचं बक्षीस होतं. झारखंडच्या पश्चिम सिंहभूम जिल्ह्याच्या चायबासा गावानजिक आराहासा भागातील बुरजूवा डोंगर परिसरात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये जोरदार चकमक उडाली त्यात तो ठार झाल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं. पोलिसांना प्राप्त माहितीनंतरच्या शोधमोहिमेदरम्यान ही कारवाई झाली. सध्या या संपूर्ण डोंगराळ परिसराला सुरक्षादलांनी वेढा घातला असून नक्षलवाद्यांना पळून जाण्याचे मार्ग बंद करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**<><><><>**

छतीसडमधल्या अबुझमाड इथं झालेल्या चकमकीत मारल्या गेलेल्या नक्षलीचं नाव सोढी विमला असं असून तिच्यावर ८ लाखांचं इनाम होतं, अशी माहिती बस्तरच्या पोलीस महानिरीक्षकांनी दिली. गेल्या शुक्रवारी अबुझमाड इथं ही चकमक झाली होती. इथून ३०३ रायफल, ३१५ बोर रायफल आणि दोन बीजीएल लॉन्चर जप्त करण्यात आले.

**<><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होईल, असा अंदाज वेधशाळेनं वर्तवला आहे.

**//<><><><>//**